# धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

**परिपत्रक** क्र ३५३

**दिनांक ३०.९.२००९**

**विषय :- रजा अर्ज सादर करणेबाबत**

धर्मादाय संघटनेतील ब-याच कर्मचा-यांच्या कडून दाखल होणारे रजेचे अर्ज हाताळतांना असे निदर्शनास येते कीं, या पूर्वीच्या (क्रमांक १९६, २१० व २४५) परिपत्रकातील निर्देशांचे पालन केले जात नाही. त्यांचे उल्लंघन केले जाते. क्षुल्लक कारणास्तव शीघ्रगतीने नैमित्तीक रजा उपभोगून, वर्षारंभीच नैमित्तीक रजा संपविल्या जातात.. त्यानंतर, अत्यल्प कालावधीसाठी अर्जित / परिवर्तीत रजेची मागणी केली जाते. दीर्घ मुदतीच्या रजा सबळ कारणाशिवाय आणि पूर्वसुचना न देता उपभोगल्या जातात. त्यामुळे, कार्यालयीन कामकाजात खूप अडचणी निर्माण होतात.

वरील स्थितीचा विचार करुन, यापूर्वीचे परिपत्रक क्रमांक २४५ मध्ये सुधारणा करुन, धर्मादाय संघटनेतील सर्व कर्मचा-यांना रजेसंबंधात खालील प्रमाणे निर्देश देणेत येत आहेत

१. अर्जित रजेचा कालावधी किमान तीन दिवसांचा तरी असावा.
२. अर्जित रजेवर जाण्यापूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या किमान तीन दिवस अगोदर रजा अर्ज सादर करावा.
३. अर्जित रजा अर्जात रजा मागणीचे सबळ कारण नमूद केलेले असावे. महत्वाचे /अतिमहत्वाचे काम यासारख्या मोघम कारणांचा विचार केला जाणार नाही..
४. अर्जित रजेवर जाण्यापूर्वी संबंधीत शाखा/कार्यालय प्रमुखांचे सुचनेनुसार कामाची माहिती अन्य सहकारी कर्मचा-यांना देवूनच रजेवर जाणेचे आहे.

धर्मादाय संघटनेतील सर्व कर्मचा-यांनी वरील १ ते ४ निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा त्यांचे अर्जित रजेचे अर्ज, मंजूरीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत व त्यामुळे होणा-या वित्तीय तसेच इतर परिणामास सर्वस्वी कर्मचारी जबाबदार राहतील.

सही/-
(म. कि. चौरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१. कार्यालयीन परिपत्रक धारिणी
२. मुख्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी
३. महाराष्ट्रातील सर्व कार्यालयीन प्रमुखांना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कर्मचा-यांचे निदर्शनासाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

मभिसरनोबत/